**महाराष्ट्र राज्य महिला आयोग**

दिनांक १३.०९.२०२१

शुक्रवार, दिनांक १०.०९.२०२१ रोजी साकीनाका, मुंबई येथे ३४ वर्षीय महिलेवर बलात्कार करुन निघृण हत्या झाल्याची घटना वृत्त वाहिन्यांवर प्रसारीत झाली. सदर घटनेची आयोगाने स्वाधिकारे दखल घेवून साकीनाका पोलीस स्टेशन येथील तपास यंत्रणा यांच्याशी संपर्क साधून सदर पोलीस स्टेशन यांना पत्रव्यवहार करण्यात आला व तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश आयोगाने दिले. त्याचप्रमाणे परिमंडळ १० चे पोलीस उप-आयुक्त यांच्याशी संपर्क साधून या घटनेची सद्य:स्थिती यावेळी जाणून घेण्यात आली. त्याचप्रमाणे या घटनेकडे आयोगाच्या सदस्य सचिव व्यक्तीश: लक्ष ठेवून आहेत. दि.११.०९.२०२१ रोजी आयोगाच्या सदस्य सचिव व महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक यांचेसमवेत राष्ट्रीय महिला आयोगाच्या मा.सदस्या यांच्याशी चर्चा करुन घटनेचा तपास शीघ्र गतीने पूर्ण होणेकरिता निर्देश महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीने देण्यात आले.